# संक्षिप्त परिचय



डॉ. शरद रामराव गडाख

| | |
|---|---|
| जन्मतारीख | २९.११.१९६१ |
| पद | कुलगुरू, डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला |
| शैक्षणिक अर्हता | वनस्पती शरीरक्रियाशास्त्र विषयात आचार्य पदवी (पी.एच. डी.) |
| अनुभव | ३९ वर्षे, ४ महिने<br>संशोधन संचालक पदाचा ५ वर्षे ९ महिने अनुभव (२०१७ ते २०२२)<br>वरिष्ठ ज्वारी पैदासकार पदाचा ८ वर्षे अनुभव (२००९ ते २०१७)<br>सहयोगी संशोधन संचालक पदाचा १ वर्ष अनुभव (२००८)<br>संचालक कृषी विस्तार शिक्षण पदाचा ३ वर्ष ६ महिने अतिरिक्त कार्यभार (२०१९ ते २०२२)<br>विभाग प्रमुख वनस्पतीशास्त्र पदाचा १ वर्ष अतिरिक्त कार्यभार (२०१६)<br>प्रमुख शास्त्रज्ञ (बियाणे) पदाचा १ वर्ष अतिरिक्त कार्यभार (२०१७) |
| विद्यार्थी संशोधन मार्गदर्शन | आचार्य पदवी (पी. एच. डी.) : १४<br>पदव्युत्तर पदवी (एम. एस. सी.) : ०८ |
| प्रकाशने | १) पुस्तके : ०८<br>२) संशोधन लेख : ८०<br>३) संशोधन पर तांत्रिक लेख : ४३<br>४) मराठी लेख : १४४<br>५) घडीपत्रिका : १७<br>६) आकाशवाणी कार्यक्रम : ४१<br>७) दुरदर्शन कार्यक्रम : २९ |
| तदर्थ संशोधन प्रकल्प | ६ तदर्थ संशोधन प्रकल्पांचे प्रकल्प अधिकारी. त्यापैकी रब्बी ज्वारीचा होप हा आंतरराष्ट्रीय प्रकल्प (बिल आणि मिलिंडा गेट फाउंडेशन या आंतरराष्ट्रीय संस्थेकडून २०७३०९ $ निधी प्राप्त). |
| उल्लेखनीय कार्य | संशोधन : २१ पीक वाणांची निर्मिती.<br>ज्वारी - ११ ▪ भाजीपाला - ९ ▪ कारळा - १ |

## उल्लेखनीय कार्य

- वेलवर्गीय भाजीपाला पिकांसाठी मंडप उभारणीचे तंत्र, रब्बी ज्वारी उत्पादन वाढीसाठीचे पंचसुत्री तंत्रज्ञान, जमिनीच्या खोलीनुसार ज्वारीच्या वाणांची निर्मिती व शिफारस, औषधी व सुगंधी वनस्पतीच्या उत्पादनावर प्राथमिक प्रक्रिया इत्यादी तंत्रज्ञानाची शिफारस.
- संशोधन संचालक कार्यकाळात विविध पिकांच्या ४१ वाणांची व ९ कृषी अवजारांची निर्मिती, पिक उत्पादन वाढीसाठी २६७ तंत्रज्ञान शिफारशींना मंजुरी व ४७ नवीन तदर्थ संशोधन प्रकल्प मिळविण्यात यश त्याद्वारे रूपये ८९ कोटी निधी मंजुर.
- विद्यापीठ प्रक्षेत्रावर तसेच शेतकऱ्यांच्या शेतावर प्रतिवर्षी सुमारे ३० हजार क्विंटल सुधारित बियाणे उत्पादन कार्यक्रम त्याचप्रमाणे विद्यापीठ रोपवाटिकेत प्रतिवर्षी १२ लाख कलमे व रोपे निर्मितीची उद्दिष्टपूर्ती.
- विद्यापीठ विकासाचे १८ प्रस्ताव कार्यान्वीत.
- अखिल भारतीय स्तरावर कृषी विद्यापीठ मानांकन ३४ वरून २३ व्या स्थानावर सुधारण्यामध्ये मोलाचे योगदान.

## विस्तार

- होप प्रकल्पाच्या माध्यमातून विद्यापीठ कार्यक्षेत्रातील २२५०० शेतकऱ्यांच्या शेतावर रब्बी ज्वारी उत्पादन वाढीचे आद्यरेषीय प्रात्यक्षिकांचे आयोजन.
- सार्वजनिक व खाजगी संस्थांच्या सहभागाद्वारे शेतकऱ्यांच्या शेतावर सुधारित वाणांचे बिजोत्पादन निर्मितीचा कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन.
- नव्याने विकसित केलेल्या वाणांचा जलद प्रसार होण्यासाठी 'एक गाव-एक वाण' संकल्पना व त्याची यशस्वी अंमलबजावणी.
- विद्यापीठ मध्यवर्ती परिसर व प्रत्येक संशोधन केंद्रावर दरवर्षी (२०१७-२०१९) कृषी तंत्रज्ञान सप्ताहांचे यशस्वीरित्या आयोजन व त्याद्वारे विद्यापीठ प्रसारित वाणांचे प्रत्यक्ष शेतावर प्रात्यक्षिक, उत्पादन वाढीसाठी तज्ञांचे मार्गदर्शन, शेतकरी संवाद व कृषी प्रदर्शन यांचे आयोजन.
- विद्यापीठ तंत्रज्ञान प्रसारासाठी प्रत्येक संशोधन केंद्रावर शेतकरी शास्त्रज्ञ मंचाची स्थापना (५४ शेतकरी शास्त्रज्ञ मंच) तसेच कार्यक्षेत्रातील प्रत्येक तालुक्यासाठी दोन शास्त्रज्ञाची कृषी विभागास मार्गदर्शन सहाय्यक म्हणून नेमणूक.

## महसूल उत्पादन

- संशोधन संचालक पदाच्या ५ वर्षे कार्यकाळात विद्यापीठ महसूल उत्पन्नात रूपये १९ कोटीवरून रूपये ४७.५० कोटी पर्यंत वाढ.
- व्यापारी तत्वावर विद्यापीठ १०० एकर प्रक्षेत्रावर सतत ३ वर्षे (२०००-०३) यशस्वी भाजीपाला उत्पादन व विक्री व्यवस्थापन ३२.०० लक्ष रूपये निव्वळ नफा
- विद्यापीठ उत्पादने (बियाणे, जैविक खते व किटकनाशके, प्रक्रियायुक्त पदार्थ इत्यादी) विक्रीसाठी २७ विक्री केंद्रे व फुले-मार्ट या ई-मार्केटिंग प्रणालीची निर्मिती.

## पारितोषिके

- ११ पुरस्कार (यामध्ये बिल आणि मिलिंडा गेट फाउंडेशन या आंतरराष्ट्रीय संस्थेकडून आउटस्टँन्डींग पार्टनरशीप अवार्ड (आशिया)-२०१४, उत्कृष्ठ संशोधनाबद्दल अखील भारतीय पातळीवरील 'उत्कृष्ठ संशोधन केंद्र पुरस्कार २०१०-११', वसंतराव नाईक स्मृती पुरस्कार, २००३, उद्योग रत्न पुरस्कार, २०११ व २०१४ इत्यादी).

## परदेशी अभ्यास दौरे

- माली, साऊथ आफ्रीका, इथिओपिया, जर्मनी, नेदरलॅन्ड , स्विझरलॅन्ड, तैवान इत्यादी.